Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 331-335

DOI: 10.5281/zenodo.10125786

Original Research Article

# महात्मा गांधीचे अहिंसा विषयक विचार

प्रा. डॉ. अशोक गंगाराम अंभोरे

विभाग प्रमुख, इतिहास विभाग, तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेनगांव ता. सेनगांव जि. हिंगोली ४३१५४२ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: ashokambhore19@gmail.com

Received: 11 October, 2023 | Accepted: 25 October, 2023 | Published: 27 October, 2023

## प्रस्तावना

महात्मा गांधीचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासातील स्थान अत्यंत महत्वाचे आहे. महात्मा गांधी इ.स. 1893 ला दक्षिण आफ्रिकेचा दौरा केला. त्या दौऱ्यामध्ये काही काळ अफ्रिकेत असलेल्या काळया व गोऱ्या वर्णभेदा विरूध्द प्रथम आंदोलन केले व त्या ठिकाणी असलेल्या काळया लोकांना न्याय मिळवून देण्याचे काम केले. महात्मा गांधीच्या व्यक्तीमत्वावर कोणतीही परंपरा व संप्रदाय, धर्मगुरू, धर्मग्रंथ यांची कोणतीही पूर्ण छाप दिसून येत नाही. त्यांनी काही तत्वे प्रेरणा आणि विचार आत्मसात करून हिंदू धर्मातील अध्यात्मवाद, जैन, बौध्द व वैष्णव पंथातील भूतदया, नितीमुल्य आणि पंचतत्वे, ख्रिस्तीधर्मातील मानवतावादी मुल्ये, आईच्या व्रताचरणाचा प्रभाव, भगवतगितेचा जीवनावर पडलेला प्रभाव त्यांना आपल्या आई वडील व आजोबाच्या सत्यनिष्ठा, व्यवहारकुशलता आणि सत्यनिष्ठा इ. गुणाचा वारसा रक्तातूनच मिळाला होता. त्यांच्या वर थोर विचारवंत स्क्रिन, टॉलस्टॉय आणि थोरो या विचारवंताचा प्रभाव महात्मा गांधीच्या जीवनावर पडला होता. महात्मा गांधीनी आपल्या विचारसरणीवर सत्य आणि अहिंसा या दोन तत्वाना महत्वपूर्ण स्थान होते. म्हणजेच महात्मा गांधीच्या सत्याच्या प्रयोगात अहिंसेचे महत्व सांगतांना जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात अहिंसेच्या तत्वाचे पालन केले पाहिजे यावरून महात्मा गांधी आपल्या जीवनात अहिंसेला किती महत्व देत होते यावरून दिसून येते.

## शोध निबंधाचे उदिष्टये

१. महात्मा गांधीच्या कार्याचा अभ्यास करणे.

२. महात्मा गांधीच्या अहिंसा विषयक विचारांचा अभ्यास करणे.

३. महात्मा गांधीच्या अहिंसा विषयक तत्वाचा अभ्यास करणे.

**तथ्य संकलनाची साधने**

सदर शोधनिबंधासाठी दुय्यम संदर्भ साधने यांचा वापर करण्यात आलेला आहे.

**संशोधन पध्दती**

शोधनिबंधासाठी वर्णनात्मक व विश्लेशणात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**महात्मा गांधीची अहिंसा**

महात्मा गांधीनी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सत्य आणि अहिंसा या दोन तत्वाना महत्वाचे स्थान देत होते. म. गांधीच्या सत्याच्या प्रयोगामध्ये अहिंसा या तत्वाला स्ािान देवून सत्य हे साधन आणि अहिंसा हे साध्य असून त्या एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत अशी महात्मा गांधीनी आपली तात्वीक भूमिका मांडलेली दिसून येते.

**अहिंसा म्हणजे काय?**

महात्मा गांधी हिंसेमध्ये बौध्दीक आणि नैतीक हिंसेचा समावेश करतात त्यामध्ये क्रोध, तिरस्कार, गर्व, अधिक्षेप, कुरकूर करणे, उताविळेपणा करणे, दुसऱ्याची हत्या करणे, त्याला जखमी करणे, धाक दाखविणे, लुबाडणे, फसविणे, विषप्रयोग करणे, दुसऱ्यांना भुलविणे, एखाद्याचे चारीत्र्य हेतु पुरस्कर विलीन करणे, या कृत्याचा अहिंसेत समावेश होतो. अहिंसा ही केवळ स्वप्नवत भावना नसुन मनुष्याच्या अंतकरणात आणि नैतिक प्रवृतीत असलेला तो एक कार्यप्रवण गुण आहे. व्यक्तीच्या ठिकाणी सुध्दा या उदात ध्येयाची पुर्तता होणे अशी महात्मा गांधीची धारणा होती. अहिसावादाची खरी कसौटी ही उच्चार, आचार व विचार यामध्ये अहिंसा वृत्ती टिकविणे होय असे म. गांधी म्हणत असत.

**महात्मा गांधीचे हिंसे विषयी विचार**

१. एखादा व्यक्ती खुपच रोगग्रस्त आहे आणि त्याला आता जगायची इच्छाच नाही त्याची जर हत्या केली तर ती हिंसा ठरत नाही.
२. माणसाने स्वतःच्या संरक्षणासाठी केलेली हत्या ही हिंसा होत नाही.
३. समाजामध्ये एखादया स्त्रीवर अत्याचार करणे आणि अत्याचार करणा या व्यक्तीचा खून करणे हि हिंसा ठरत नाही.
४. शेतामध्ये शेतकऱ्याचे पीक नष्ट करणारी जी जनावरे वानरे, किटक, किडे, यांची हत्या केली तर ती हिंसा होत नाही. अशी विचारधारा महात्मा गांधीची होती.

**अन्यायाच्या प्रतिकारासाठी शस्त्राचा वापर**

महात्मा गांधी म्हणतात की, अन्यायाचा प्रतिकार जर अहिंसक मार्गाने शक्य नसेल तर मग शस्त्राचा वापर केला पाहिजे. स्वस्थ बसणे हे मानवाला शोभून दिसत नाही. महात्मा गांधीनी जैन साधु नाकावर जे पट्ट्या बांधतात त्यांच्यावर टिका करीत असत. म्हणजे हिंसेबाबत महात्मा गांधीनी तडजोड केली नाही.

**महात्मा गांधीची अहिंसे संबंधी तत्वे**

महात्मा गांधीनी अहिंसेसंबंधी तत्वे पुढील प्रमाणे आहेत.

१. मानवजातीच्या उध्दारासाठी अहिंसा
२. अहिंसेवर श्रध्दा ठेवणे म्हणजे मूर्तीमंत परमेश्वरावर श्रध्दा ठेवणे

३. अहिंसा म्हणजे मनापासून केलेल्या प्राथनेचे अंतस्थ दिलेले उत्तर होय.
४. अहिंसा व सत्य ही अविभाज्य अंगे आहेत.
५. अहिंसा म्हणजेच आत्मविश्वास होय.
६. अहिंसा हे बलीष्ठांचे आणि धैर्यमेरूचे हत्यार होय
७. हिंसेच्या विध्वंसाचे निराकरण अहिंसाच करू शकेल.
८. भारतास हिंसेची परंपरा नसून अहिंसेची परंपरा आहे.
९. अहिंसा हि शिकवून येत नाही तर ती आचरणानेच येत असते.
१०. हिंसा अहिसा संघर्षात नेहमीच अहिंसेचाच विजय झालेला आहे.
११. हिंसा ही वाईट आहे म्हणून तीचा निषेध केला पाहिजे.
१२. जमीनदार पध्दती ही हिंसात्मक मार्गाने नष्ट झाली पाहिजे.

महात्मा गांधीने अहिंसेच्या वापरासाठी या तत्वाचा अवलंब केलेला दिसून येतो. महात्मा गांधी अहिंसा या तत्वाविषयी कोणतीच तडजोड करत नाही. हे गांधी विचाराचे एकमेव तत्व होय.

**अहिंसे संबंधी पाच सिध्दांत सूत्रे**

महात्मा गांधीनी अहिंसे संबंधी पाच प्रकारचे सिध्दांत सांगीतले आहेत.

१. अहिंसा ही हिंसेपेक्षा श्रेष्ठ आहे.
२. हिंसेचे परीणाम निश्चितपणे पराजयात होते.
३. हिंसा करण्याचे जितके प्रमाण तेवढी शक्ती अहिंसेमध्ये असते.
४. अहिंसेत आत्मशुध्दी अभिप्रेत आहे.
५. अहिंसेचे निसंशय विजय हे अंतीम फल असते.

म्हणजे महात्मा गांधीची अहिंसा ही व्यावहारीक आणि नैतीक पातळीवर असून तीचे जर पालन केले तर व्यक्तीचे हृद्य परिवर्तन होवू शकते. असे महात्मा गांधीचे मत होते.

**हिंसा या तत्वापेक्षा अहिंसेत जास्त शक्ती आहे**

महात्मा गांधीनी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात अहिंसा या तत्वाचा वापर केला पाहिजे. कारण व्यक्तीने किंवा समुदायाने अहिंसेचा उपयोग करणे गरजेचे आहे. शस्त्राच्या जोरावर मिळालेला विजय हा विजय नसतो. हिंसेमूळे व्यक्तीचा, समाजाचा किंवा देशाचा विकास होत नसतो, असे महात्मा गांधी म्हणत असत.

**वैयक्तीक विकास करण्याची संधी**

हिंदुस्थान हा एकच असा देश आहे की वैयक्तीक स्वातंत्र्याचा विकास करण्याची भरपूर संधी आहे. विशुध्द अहिंसेवर आधारलेल्या शासनातच मिळू शकेल. तसेच हिंदुस्थानला जगाला शांतीचा संदेश देण्याचा अधिकार आहे. विधात्याने हिंदूस्थानकडे अहिंसेची साधना सोपवून साधनेला अनुकूल अशी नैसर्गीक परिस्थीतसुध्दा उपयोग करून घेतला पाहिजे. हिंदूस्थानला पूर्ण स्वराज्याचे ध्येय जर गाठायचे असेल तर अहिंसाशिवाय कोणताही मार्ग नाही, असे महात्मा गांधीचे मत होते.

### अहिंसा ही आपल्या जीवनाचे अविभाज्य अंग बनली पाहिजे

महात्मा गांधीने अहिंसेची गरज हि व्यक्ती मधील खाजगी व्यवहारातही सांगीतली पाहिजे. संपूर्ण जगाला अहिंसेच्या मार्गाने शांतीदूताचे काम मला आवडेल अशी ईच्छा महात्मा गांधीजी व्यक्त करतात. हिंदू मुस्लीम ऐक्य अस्पृृश्यता निवारण, दारूबंदी या गोष्टी हिंसेवाचून अशक्य आहेत. अहिंसा ही आपल्या जीवनाचे अविभाज्य अंग बनली पाहिजे. जो व्यक्ती मृत्यूला भितो त्याच्यात कुठलीही प्रतिकाराची शक्ती नाही. अशा व्यक्तीला अहिंसा शिकविता येत नाही असे महात्मा गांधीचे मत होते.

### विनंम्राशिवाय अहिंसा अशक्य आहे

अहिंसा हे सर्वश्रेष्ठ बल आहे अहिंसा या बलाचा वापर सर्वसामान्य माणूस आकलन करू शकत नाही. माणसाला अहिंसा या प्रखर बलाचे तेज सहन करू षकत नाही. एखाद्या माणसात जर अहंभाव आणि अहंमान्यता असेल तर तेथे कसल्या प्रकारे अहिंसा राहू शकत नाही. म्हणून विनंम्राशिवाय अहिंसा ही अशक्य आहे असे महात्मा गांधी म्हणत असत.

### महात्मा गांधीची शांतीदलाची योजना

महात्मा गांधीने देशाला अहिंसेचे शिक्षण देण्याच्या माध्यमातून उपक्रम हाती घेतला इ.स.1938 मध्ये शांती दलाची योजना महात्मा गांधीने आखली. शांतीदलाला प्रत्येक सभासद दंग्यात म्हणजे जातीय दंग्यात आपल्या प्राणावर उध्दार झाला पाहिजे. त्याची अहिंसेवर श्रध्दा असली पाहिजे. त्याला इतर धर्मियाबद्दल सारखाच आदर वाटला पाहिजे. त्याचे चारीत्र्य निसंशयातील असले पाहिजे. तो अत्यंत काटेकोर आणि निःपक्ष असला पाहिजे. तो शांतीदलातील सैनिक आहे यासाठी त्यांनी विशीष्ट पोशाख घातला पाहिजे. जेव्हा जातीय दंगे होतील तेव्हा शांतीदलाने पूढे आले पाहिजे. शांतीदलाने कोणतेही हत्यार बाळगू नये. खेडयात, गल्लीत, मोहल्यात या शांती सेना लहान असतील त्याच्याकडे प्रथमोपचाराचे साहित्य असले पाहिजे. त्याला ते वापराचे शिक्षण असले पाहिजे असे महात्मा गांधीचे मत होते.

### सारांश

महात्मा गांधी हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील अध्वर्यू मानले जातात ते अहिंसेबद्दल त्यांनी जनजागृती केली. भारताच्या स्वातंत्र्याची चळवळ ही जनतेतूनच पूर्ण झाली पाहिजे. महात्मा गांधीनी सर्व मानवी समाजाच्या उन्नतीसाठी खूप मोठा प्रयत्न केलेला दिसून येतो. देशामध्ये राजकीय, सामाजीक, धार्मीक, आर्थीक, शैक्षणिक या समस्या असतील त्या सोडविण्याचा अहिंसेचा विचार धारेवर त्यांनी प्रयत्न केलेला दिसून येतो. महात्मा गांधीनी हिसेला कोणत्याही प्रकारे आपल्या जीवनात स्थान दिले नाही. आज माणूस अहिंसा हे मुल्य विसरत चालला आहे. अहिंसा हे तत्व किती बलवान आहे हे व्यक्तीला समजणे गरजेचे आहे. जोपर्यंत व्यक्तीच्या अंगी अहिंसा हे मुल्य रूजणार नाही तोपर्यंत व्यक्ती समाज आणि देशाचा विकास होणार नाही. माणसातील माणूसपण टिकविण्यासाठी अहिंसा या मुल्यांची नितांत गरज आहे. हिंसेला उत्तर हे अहिंसेनेच देता येते असे महात्मा गांधीचे विचार होते.

### संदर्भ ग्रंथ

१. डॉ. एस.एस.गाठाळ- भारताचा इतिहास व संस्कृती (इ.स.1762 ते 1950) कैलास पब्लीकेशन, औरंगाबाद, जुलै 2008

२. डॉ. अनिल कठारे - आधुनिक भारताचा इतिहास (इ.स.1858 ते 1947) प्रशांत पब्लीकेशन, जळगांव, जून 2015

३. भोळे भास्कर - आधुनिक भारतीय राजकिय विचारवंत, पिंपळापूरे अॅण्ड कंपनी पब्लीशर्स, नागपुर, 2003

४. शिंदे ज.रा. - भारतीय राजकीय विचारवंत, कैलास पब्लीकेशन औरंगाबाद.

५. Mr. Arun.B. Godam (editor) Chief. Editor- Relevance of Mahatma Gandhi in today's world, Shaurya Publication Latur-2020 special issue-28,Vol-2